॥ मला लागली कुणाची उचकी ॥

गायिकाः उषा मंगेशकर
गीतः जगदीश खेबुडकर
संगीतः राम कदम
चित्रपटः पिंजरा

आलि आलि सुगि, म्हनुन चालते बिगि बिगि,
गोष्ट न्हाइ सांगण्याजोगि,
कुनी गालावर मारली टिचकी,
मला लागली कुणाची उचकी?

कोरसः कुणाची ग कुणाची? ह्याची का त्याची?
लाजुं नको, लाजुं नको, लाजुं नको
मला लागली कुणाची उचकी? ॥ धृ. ॥

तरणीताठी, नार शेलाटी, चढलें मी बांधावर
अटकर बांधा, गोरागोरा खांदा, पदर वार्यावर
कानामध्ये चाहुल, वाजलं त्याचं पाउल
माझ्या उरांत भरली धडकी ॥ १ ॥

वार्याचा लाटा, थंडीचा काटा, मनांत न्यारी खुषी
सपनांत आला, त्यानं चेडलं बाई मला
त्याच्या डोळ्याची नजर तिरकी ॥ २ ॥

उठून सकाळीं, लै येखळीं, गेलें पाणवठ्यावरी,
उन्हांत बसलें न्हात, अंगाला पानि गुदगुल्या करी,
पाण्यामध्ये दिसं त्याचं लागलं मला पिसं
त्यानं माझीच घेतली फिरकी ॥ ३ ॥